दैनिक पुढारी,शुक्रवार, दिनांक 15 मार्च 2024,
पान चार, माय कोल्हापूर.

# उदयसिंह राजेयादव यांना पीएच. डी.



कोल्हापूर : राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनी व श्रीमंत राजेयादव चॅरिटेबल ट्रस्टचे अजीवन अध्यक्ष उदयसिंह मानसिंगराव राजेयादव यांना शिवाजी विद्यापीठाने पीएच. डी. पदवी जाहिर केली. 'करवीरनिवासिनी मंदिराचा संवादशास्त्रीय अभ्यास' या विषयावर त्यांनी शोधनिबंध सादर केला. यासाठी त्यांनी १७ वर्षे सखोल संशोधन केले. यात त्यांनी अंबाबाई तथा महालक्ष्मी मंदिरातील ८० हून अधिक शिलालेख आणि महत्त्वपूर्ण अशा १० हजारांहून अधिक मोडी कागदपत्रांचा अभ्यास केला. त्यांना वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्दचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, शिवाजी विद्यापीठ वृत्तपत्र विद्या व संवाद शास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. शिवाजी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक सकाळ कोल्हापूर शनिवार 9 मार्च 2024 पान दोन

## दृष्टिक्षेपात

# उदयसिंह राजेयादव यांना पीएच.डी.



राजेयादव

कोल्हापूर, : राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनी आणि श्रीमंत राजेयादव चॅरिटेबल ट्रस्टचे आजीवन अध्यक्ष उदयसिंह मानसिंगराव राजेयादव यांना शिवाजी विद्यापीठाने पीएच.डी. पदवी जाहीर केली आहे. त्यांनी 'करवीर निवासिनी मंदिराचा संवादशास्त्रीय अभ्यास' या विषयावर शोधनिबंध विद्यापीठाला सादर केला. त्यांना ऐतवर्ड खुर्द येथील वारणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. राजेयादव यांना सतरा वर्षांच्या सखोल संशोधनानंतर पीएच.डी. पदवी जाहीर झाली. यामध्ये करवीर निवासिनी श्री महालक्ष्मीची ऐंशीहून अधिक मोडी कागदपत्रे यावर मूलभूत संशोधन करून अप्रकाशित बाबींवर प्रकाश टाकला आहे. त्यांना डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. शिवाजी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

४ पुण्यनगरी

। शुक्रवार, ८ मार्च २०२४ | SMART कोल्हापूर

# राजेयादव यांना विद्यापीठाची पीएच.डी.

कोल्हापूर : राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनी श्रीमंत राजेयादव चॅरीटेबल ट्रस्टचे आजीवन अध्यक्ष उदयसिंह राजेयादव यांना शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. पदवी जाहीर झाली. त्यांनी वारणा महाविद्यालय (ऐतवडे खूर्द ) येथील प्राचार्य डॉ. प्रताप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली 'करवीर निवासिनी मंदिराचा संवादशास्त्रीय अभ्यास' या विषयावर शोधनिबंध सादर केला. तब्बल १७ वर्ष संशोधन करुन त्यांनी पदवी मिळवली. यात अंबाबाई मंदिरातील ऐतिहासिक शिलालेख, महत्वपुर्ण मोडी कागदपत्रे यातील संशोधन केले. त्यांना विद्यापीठाच्या वृत्तपत्रविभाग प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. शिवाजी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.



दैनिक तरुण भारत शनिवार 9 मार्च 2024
कोल्हापूर दिनांक पान तीन

# उदयसिंह राजेयादव यांना पीएच. डी.

कोल्हापूर : राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिव श्रीमंत राजेयादव चॅरिटेबल ट्रस्टचे आजीवन अध्यक्ष उदयसिंह राजेयादव यांना शिवाजी विद्यापीठाची पीएच. डी. पदवी जाहीर झाली आहे. 'करवीर निवासिनी मंदिराचा संवादशास्त्रीय अभ्यास' या विषयावर त्यांनी शोधप्रबंध सादर केला आहे. या विषयासाठी त्यांना ऐतवडे खुर्द वारणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या शोधप्रबंधात यादव यांनी करवीर निवासिनीचे ८० हून अधिक मोडी कागदपत्रांवर संशोधन करून करवीर निवासिनीचा इतिहास समाजासमोर आणला आहे.त्यांना वृत्तपत्र व संवादशास्त्र विभागप्रमुख डॉ. निशा पवार, मास कम्युनिकेशनचे डॉ. शिवाजी जाधव यांचे सहकार्य लाभले.

